निपक्ष व निर्भिड वृत्तपत्र

# आत्ताच एक्सप्रेस

छत्रपती संभाजीनगर
मंगळवार
२३ डिसेबंर २०२५
पाने: ०४ । किंमत: २ .००
वर्ष: १५ वे । अंक: २९० वा

RNI.No.MAH/MAR2011/39247

E-mail:dainikattachexpress@gmail.com | E-Paper : http://attachexpress.in | Post Regd.No. G 2/RNP/AGD-441/2024-26 | मुख्य संपादक- सुग्रीव मुंढे

## संक्षिप्त

### आपदा मित्र प्रशिक्षण कार्यक्रम; इच्छुकांकडून अर्ज मागविले

**आत्ताच एक्सपप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर/ प्रतिनिधी** / जिल्ह्यात आपदा मित्र प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यात येणार आहे. हा प्रशिक्षण कार्यक्रम १२ दिवसांचा व निवासी स्वरुपाचा आहे. जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाने इच्छुकांकडून अर्ज मागविले आहेत. हे प्रशिक्षण कोलाड जि. रायगड येथे दिले जाणार असून संपूर्ण प्रशिक्षण मोफत आहे. जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण यांच्या वतीने शुक्रवार दि. २ जानेवारी २०२६ रोजी इच्छूक स्वयंसेवकांच्या बॅचेस कोलाड, जि.रायगड येथे पाठविण्यात येणार आहेत. प्रशिक्षण कार्यक्रम पूर्णत: मोफत असून प्रत्येक आपदा मित्राकरीता वैयक्तिक आपत्कालीन प्रतिसाद संच (एठघ), तीन वर्षाकरीता ५ लाखांचे विमा संरक्षण तसेच येणे - जाणे आणि निवास व भोजनाची व्यवस्था पूर्णत: विनामूल्य करण्यात आली आहे. प्रशिक्षणासाठी इच्छूक असलेल्या व यापूर्वी नामनिर्देशने सादर करण्यात आलेल्या स्वयंसेवकांनी आवश्यक कागदपत्रे जिल्हाधिकारी कार्यालयात मंगळवार दि.३० डिसेंबर २०२५ पर्यंत जमा करावी.

**आवश्यक कागदपत्रे:** १.आधार कार्ड. २.T.C. किंवा Nationality ३. महाविद्यालयाचे ओळखपत्र ४. पासपोर्ट फोटो ५. नोकरी करत असल्यास नोकरीचे ओळखपत्र

**आपदा मित्र निवड निकष :** १. प्रशिक्षणार्थी व्यक्ती ही भारताची नागरिक व छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील रहिवासी असावी. २. शारीरिक व मानसिक दृष्ट्या सक्षम असावी. ३. १८ ते ४५ वर्ष वयोमर्यादा (माजी सैनिक, डॉक्टर, स्थापत्य अभियंता, शास्त्रज्ञ, आपत्कालीन सेवेतून सेवानिवृत्त अधिकारी व कर्मचारी यांना आपदा मित्र प्रशिक्षण कार्यक्रमात सहभागी करून घेता येईल, त्या करीता वयोमर्यादा ५५वर्षे असेल. मात्र त्यांना विमा सुरक्षा देता येणार नाही) आपदा मित्र प्रशिक्षणासाठी पात्र घटक : या प्रशिक्षणासाठी नागरिक, महाविद्यालयीन विद्यार्थी, आशा, अंगणवाडी सेविका, होमगार्ड, पोलीस, महाराष्ट्र सुरक्षा बल, खाजगी सुरक्षा रक्षक, ग्राम पंचायत,नगरपालिका,जिल्हा परिषद ,जिल्हाधिकारी कार्यालय,शासकीय महामंडळे (महावितरण / डढ महामंडळ) राज्य शासन,केंद्र शासन (पोस्ट ऑफिस) यांचे शासकीय , निम शासकीय व कंत्राटी कर्मचारी. ज्यांना प्रशिक्षण घ्यावयाचे असेल त्यांनी १.दिपक राजेंद्र उदावंत, जिल्हाधिकारी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर संपर्क क्रमांक ७०५८०१०४५० व मोहम्मद अर्शी खान, DDMS, छत्रपती संभाजीनगर संपर्क क्रमांक ९९१०७२८४८७ अथवा ddmoaurangabad16gmail.com या ई-मेलवर संपर्क साधावा.

# भाजपा माध्यम विभाग प्रमुख नवनाथ बन यांचा घणाघात

## पराभवाच्या भीतीपोटी जुळवून आणलेले ठाकरे बंधूंचे 'भीती संगम' नाटक फ्लॉप ठरणार

**आत्ताच एक्सपप्रेस**

**मुंबई/ प्रतिनिधी** /

आगामी महापालिका निवडणुकांमध्ये पराभव होण्याची भीती असल्यानेच ठाकरे बंधू एकत्र येऊन 'प्रीतिसंगम' नव्हे तर 'भीतीसंगम' नाटक सादर करणार आहेत. हा 'भीतीसंगम' प्रयोग मतदार फ्लॉप ठरवणार आहेत, अशा शब्दांत भारतीय जनता पार्टीचे माध्यम विभाग प्रमुख नवनाथ बन यांनी उबाठा- मनसे युतीची खिल्ली उडवली. भाजपा प्रदेश कार्यालयात सोमवारी झालेल्या पत्रकार परिषदेमध्ये ते बोलत होते. उद्धव ठाकरे यांनी त्यांच्या भावाला घरातून हाकलले, त्यांचा मनसे पक्ष फोडण्याचा प्रयत्न केला होता आता पराभवाच्या भीतीमुळे याच भावासाठी प्रीतीचे खोटे भरते येत असल्याची टीकाही त्यांनी केली.

यावेळी श्री. बन म्हणाले की, राज ठाकरे १०० जागांची मागणी करत असताना त्यांच्या मनसे ला ६० जागा देऊन त्यांची बोळवण करण्याचा प्रयत्न उबाठा गटाकडून होत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली देश आणि राज्याची होत असलेली विकासाची घोडदौड मतदारांसमोर आहे. म्हणूनच ठाकरे बंधूंच्या या भीतीसंगम नाटकाच्या प्रयोगाचा कितीही गाजावाजा करत घाट घातला तरी ते नाटक रंगमंचावर येण्याआआधीच पडणार हे निश्चित आहे. महायुतीचा प्रयोग हाउसफुल्ल होणार आणि मुंबईसह सर्व महापालिका निवडणुकांमध्ये भाजपा




महायुतीचाच झेंडा फडकणार असा विश्वास श्री. बन यांनी व्यक्त केला.

या नगरपालिका, नगरपंचायत निवडणुकीत भाजपाने पैशांची उधळपट्टी केली या राऊतांच्या टिकेचा खरपूस समाचार घेत श्री. बन यांनी राऊतांना याबाबतचे ठोस पुरावे द्या, अन्यथा वायफळ बडबड थांबवा असे आव्हान दिले. भ्रष्टाचार करणारे,घोटाळे करणारे राऊत कुठल्या तोंडाने ही टीका करतात असे खडे बोल ही त्यांनी सुनावले.

पालिका निवडणुकांमध्येही देवेंद्र फडणवीसच 'धुरंधर' - उद्धव ठाकरे रेहमान डकैत

नगरपालिका, नगर पंचायतीच्या निवडणुकांमध्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विरोधकांना धूळ चारली. नगरपालिकांपाठोपाठ आता महापालिका निवडणुकांमध्ये देखील मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसच 'धुरंधर' ठरणार आहेत. छत्रपती संभाजीनगरच्या नामांतराच्या विरोधात याचिका दाखल करणा-या लोकांना उबाठा गटामध्ये सामील करून घेतले त्यामुळे उद्धव ठाकरे, आदित्य ठाकरे आणि राऊत हेच रेहमान डकैत असल्याचे ते म्हणाले. नगर पालिका, नगर पंचायत निवडणुकीत धुरंधर कोण यावर मतदारांनीच शिक्कामोर्तब केल्याचेही ते म्हणाले.

रोहित पवारांवर श्री. बन यांचा पलटवार

काँग्रेस ही भाजपाची बी टीम असा हास्यास्पद आरोप करणा-या रोहित पवारांवर श्री. बन यांनी पलटवार केला. मविआ चा घटक पक्ष असलेल्या काँग्रेसला पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पेक्षा तिप्पट जागा मिळाल्या म्हणून असुयेपायी रोहित आरोप करत असल्याचे श्री. बन म्हणाले

निलेश राणे आणि महायुतीची एकजूट कायम

निलेश राणे हे महायुतीचेच आहेत. सिंधुदुर्गामध्ये काही ठिकाणी आमची युती होऊ शकली नाही त्याच्यामुळे आम्ही वेगवेगळे लढलो. काही मतभेद झाले मात्र आमच्यात मनभेद काहीही नाहीत असे श्री. बन यांनी स्पष्ट केले.

निवडणूक जिंकल्यावर मिरवणूक आणि हरल्यावर राऊतांचे रडगाणे

लहान मूल जसे जिंकले की उड्या मारते आणि हरले की रडारड करते तसे राऊतांचे निवडणूक हरल्यानंतर रडगाणे सुरू होते. बालिशपणातूनच राऊतांनी बिहार, तेलंगणाचा मुद्दा समोर आणला आहे अशी प्रखर टीका श्री. बन यांनी केली. घरात बसणा-यांना मतदारांनीच घरी बसवले आणि अहोरात्र विकास करणा-यांना खुर्चीत बसवले असेही ते म्हणाले.

### प्रशासकीय कामकाजात संवाद कौशल्य वापरा- जिल्हाधिकारी दिलीप स्वामी

**आत्ताच एक्सपप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर/ प्रतिनिधी** / ग्राम,तालुकास्तरावरील अधिकारी - कर्मचारी हेच प्रशासनाचा चेहरा असतात. आपल्या संभाषणानुसार आपली वैयक्तिक नव्हे तर प्रशासनाचीही प्रतिमा जनमानसात तयार होते. त्यामुळे प्रशासकीय कामकाजात संवाद कौशल्य अवश्य वापरावे, असे आवाहन जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी आज येथे केले.

छत्रपती संभाजीनगर, पैठण व फुलंब्री येथील मंडळ अधिकारी व ग्राम महसूल अधिकारी यांची एक दिवसीय प्रशिक्षण कार्यशाळा आज जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन सभागृहात पार पडली. प्रमुख मार्गदर्शक म्हणून निवृत्त उपजिल्हाधिकारी संजय कुंडेटकर हे उपस्थित होते. निवासी उपजिल्हाधिकारी जनार्दन विधाते, उपविभागीय अधिकारी डॉ. व्यंकट राठोड, नीलम बाफना, तहसिलदार डॉ. शिवानंद बिडवे, श्रीमती योगिता खटावकर, उमेश पाटील, ग्राम महसूल अधिकारी संघटनेचे अध्यक्ष अनिल सुर्यवंशी, सतिष भदाणे आदी मान्यवर उपस्थित होते.

जिल्हाधिकारी स्वामी यांनी सांगितले की, प्रशासकीय यंत्रणेला अद्यावत तंत्रज्ञान, कायद्यातील बदल, सामजिक बदल यानुसार करावयाचे प्रशासकीय कामकाज याबाबत प्रशिक्षणातून मार्गदर्शन केले जावे. दैनंदिन कामकाजात होणाऱ्या लहान लहान चुका यातून टाळता येतील. त्यासाठी नागरिकांशी साधावयाचे संवाद याबाबत कौशल्य आत्मसात करणे आवश्यक आहे.

प्रमुख मार्गदर्शक संजय कुंडेटकर यांनी उपस्थितांना महसूली कायदे, गाव पातळीवर द्यावयाच्या सेवा, विविध दाखले, परवानग्या याबाबत सखोल मार्गदर्शन केले.

# शाळा अनुदान, जुनी पेन्शन योजना मिळवून देणार : आ. विक्रम काळे

**आत्ताच एक्सपप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर/ प्रतिनिधी** / विनाअनुदानित शाळांना शंभर टक्के अनुदानित करणे आणि इतर राज्यांप्रमाणे महाराष्ट्रात जुनी पेन्शन योजना लागू करणे हे मुख्य दोन प्रश्न सोडविणे हेच माझे पुढील काळातील ध्येय असल्याचे मराठवाडा शिक्षक मतदारसंघ निवडणुकीतील महाविकास आघाडीचे उमेदवार आ. विक्रम काळे शिक्षकांशी संवाद सांगताना सांगितले. विक्रम काळे चौथ्यांदा निवडणूक रिंगणात आहेत. मराठवाड्यातील प्रत्येक शिक्षकाला अगदी सहज उपलब्ध होणारा आमदार अशी माझी ओळख आहे. शिवाय 'आमदार आपल्या दारी', 'शिक्षक दरबार' उपक्रम सुरू करणारे पहिले आमदार आहे.

आघाडी सरकार असताना शाळा, वर्गतुकड्या व कनिष्ठ महाविद्यालयांचा कायम शब्द काढला. विनाअनुदान शाळांची संच मान्यता व वैयक्तिक मान्यता सुरू केली, मोफत पाठ्यपुस्तक व शालेय पोषण आहार योजना लागू करून घेतली, सहावा व सातवा वेतन आयोग लागू केला. विद्यार्थी पटसंख्या २० व २५ वर केली. शिक्षण सेवकांचे नाव बदलून सहायक शिक्षक करून घेतले, वाढत्या महागाईमुळे शिक्षकांचे मानधन दुप्पट करून घेतले. महिला शिक्षकांच्या प्रसूती रजेमध्ये वाढ करून घेतली. कनिष्ठ महाविद्यालयीन व एमसीव्हीसी शिक्षकांचा अनेक वर्षापासूनचा जिव्हाळ्याचा पाचव्या वेतन आयोगाच्या वेतनश्रेणीचा प्रश्न सोडवून घेतला. प्राध्यापक भरतीसाठी संवर्गनिहाय आरक्षण लागू करून घेतले. तासिका तत्त्वावरील प्राध्यापकांच्या मानधनामध्ये वाढ करून घेतली.

कोरोना सारख्या संकट काळात तीन वर्षे २०१९-२० ची संचमान्यता कायम ठेवली. वरिष्ठ व निवड श्रेणीचे प्रशिक्षण ऑनलाइन केले. कोरोना व म्युकर मायकॉसिस या महागड्या आजाराचा समावेश वैद्यकीय बिलाच्या प्रतिपूर्तीच्या यादीत केला. सभागृहात शिक्षकांचे प्रश्न मांडत असताना मंत्र्यांकडून समाधानकारक उत्तर मिळाले नाही तर अनेकवेळा सभात्याग करण्याची भूमिकादेखील घेतली. यापुढे प्रलंबित प्रश्न सोडविण्यासाठी प्रयत्नशील असल्याचे आ. काळे यांनी सांगितले. **विद्यार्थी गुणवत्तेसाठी प्रयत्न करणार :** विद्यार्थी हे आमचे दैवत आहे. विद्यार्थी आहे म्हणून शाळा आहे. शाळा आहे म्हणून शिक्षक आहे. हे सूत्र आम्हाला मान्य आहे. त्यामुळे मुलांमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी, यासाठी वाचाल तर वाचाल या संकल्पनेतून शासनाच्या नियमात बसणाऱ्या मराठवाड्यातील माध्यमिक शाळा, जि. प. शाळा , कनिष्ठ व वरीष्ठ महाविद्यालये, आश्रमशाळा अशा एकूण ३ हजार ३०० शाळा-महाविद्यालयात ११ लाख २५ हजार पुस्तकांचे वितरण केले. त्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळावे हे आमचे कर्तव्य आहे. त्यामुळे शिक्षक पदासाठी गुणवत्ताधारक उमेदवारांना प्राधान्य दिले पाहिजे, असे माझे ठाम मत आहे. पवित्र पोर्टल रद्द करावे, अशी आमची मागणी नाही. परंतु, त्यातील काही त्रुटी दूर करायला हव्यात. संचमान्यता होत नाही, तोपर्यंत शिक्षक भरती होणार नाही. शिक्षकांच्या अनेक जागा, पदे रिक्त आहेत. संचमान्यता व समायोजन झाल्यानंतर नक्की किती जागा रिक्त आहेत, हे समजू शकेल असे आ. काळे म्हणाले.











# आर्थिक उदारीकरणाचे जनक : पी व्ही नरसिंहराव

भारताचे माजी पंतप्रधान, नवीन आर्थिक धोरणांची सुरवात करणारे, विद्वान व्यक्तिमत्व पी व्ही नरसिंहराव यांची आज पुण्यतिथी. २८ जून १९२१ रोजी आंध्रप्रदेशातील करीमनगर जिल्ह्यातील वंगारा या गावात त्यांचा जन्म झाला. त्यांचे शिक्षण उस्मानिया विद्यापीठ, मुंबई विद्यापीठ आणि नागपूर विद्यापीठ येथे झाले. मातृभाषा तेलगूबरोबरच हिंदी, इंग्रजी, मराठी, कन्नड यासारख्या दहा भाषांसह सहा विदेशी भाषा देखील त्यांना अवगत होत्या. त्यांनी भारताच्या स्वातंत्र्य संग्रामात आणि हैदराबाद मुक्ती संग्रामात भाग घेतला. १९३५ साली हैदराबादच्या निजामाने विद्यापीठात वंदे मातरम हे गीत गण्यास बंदी घालून निजामाचे गौरव करणारे गीत गाण्याचा आदेश दिला होता तेंव्हा विद्यार्थी दशेतील नरसिंहराव यांनी त्याला कडाडून विरोध केला होता. १९६२ साली ते पहिल्यांदा केंद्रीय मंत्रिमंडळात मंत्री बनले. १९७१ सालापर्यंत ते केंद्रात मंत्री होते. या दरम्यान त्यांनी गृह, परराष्ट्र आणि संरक्षण यासारखी महत्वाची खाती सांभाळली. १९७१ ते १९७३ या काळात ते आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री होते. त्यांच्या मुख्यमंत्री पदाच्या काळात भूमी सुधारणा लागू करणारे आंध्रप्रदेश हे भारतातले पहिले राज्य बनले. १९७७ च्या लोकसभा निवडणुकीत काँग्रेस पक्षाचे अनेक दिग्गज नेते पराभूत झाले पण नरसिंहराव विजयी झाले. १९८४ व १९८९ ची लोकसभा निवडणूक त्यांनी महाराष्ट्रातील रामटेक मतदारसंघातून लढवली व जिंकली. १९९१ साली राजीव गांधी यांच्या हत्येनंतर ते काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष बनले. लोकसभा निवडणुकीचा निकाल लागल्यावर त्यांची पंतप्रधान म्हणून सर्वानुमते निवड करण्यात आली. पंतप्रधान बनल्यावर देशाची विस्कटलेली आर्थिक घडी सांभाळण्याचे मोठे आव्हान त्यांच्यासमोर होते. त्यांनी मनमोहन सिंग यांची अर्थमंत्री म्हणून नेमणूक केली. मनमोहन सिंग हे निष्णात अर्थतज्ज्ञ होते. नरसिंहराव, मनमोहन सिंग जोडीने आधीच्या सरकारचे सर्व निर्णय बाजूला ठेवून आर्थिक उदारीकरणाचा मार्ग स्वीकारला. ज्यावेळी अतिशय गंभीर आर्थिक संकटातून देश सावरला त्यावेळी नरसिंहराव यांना फादर ऑफ इंडियन इकॉनॉमिक रिफॉर्म्स असे म्हटले जाऊ लागले. यासाठी १९९४ साली मनमोहन सिंग यांना युरोमनीने सर्वोत्तम अर्थमंत्र्यांच्या पुरस्काराने गौरविण्यात आले तेंव्हा त्यांनी आपल्या भाषणात सांगितले की याचे खरे श्रेय नरसिंहराव यांना दिले गेले पाहिजे. नरसिंहराव सरकारने १९९२ सालच्या अर्थसंकल्पात परकीय गुंतवणुकीला पोषक धोरण आणले त्यामुळे शेअर बाजारात तेजीचे वातावरण निर्माण झाले. मोठ्या प्रमाणावर तोट्यात असलेल्या सरकारी संस्थांचे पुनर्जीवन करण्यासाठी खाजगीकरणाची सुरवात नरसिंहराव यांनी केली तर सेबी अर्थात सिक्युरिटी एक्सचेंज बोर्ड आणि नॅशनल स्टॉक एक्सचेंजची सुरवात देखील त्यांनीच केली. देशाच्या विकासाला गती देण्यासाठी त्यांनी खासदार निधीची सुरवात केली. सत्तेवर आल्यावर त्यांनी पंजाबमध्ये निवडणुका घेतल्या या निवडणुकीनंतर बियांत सिंग हे पंजाबचे मुख्यमंत्री बनले. त्या सरकारने दहशतवादाविरुद्ध कठोर पावले उचलून राज्यात शांतता प्रस्थापित केली. पंजाबमधील दहशतवादाचे उच्चाटन करण्यामध्ये आणि फुटीरतावादी चळवळीला क्षीण करण्यामध्ये नरसिंहराव यांनी त्यांच्या खंबीर निर्धाराचे दर्शन घडवले. नरसिंहराव म्हणायचे जग बदलले आहे, देशात देखील बदल झाले पाहिजेत. आपल्या याच सिद्धांताला सोबत घेऊन भारताच्या परराष्ट्र धोरणाला नवा आकार देत त्यांनी आग्नेय आशिआई देशांसोबत मैत्रीचा प्रारंभ लूक ईस्ट या धोरणाने केला. सत्तेवर असताना त्यांच्यावर भ्रष्टाचाराचे आरोप झाल्याने १९९८ सालच्या निवडणुकीत काँग्रेसने त्यांना उमेदवारी नाकारली त्यामुळे त्यांनी राजकारण संन्यास घेतला. त्यांच्यावरील भ्रष्टाचाराचे आरोप न्यायालयात सिद्ध होऊ शकले नाहीत. २३ डिसेंबर २००४ रोजी त्यांचे निधन झाले. आज त्यांच्या पुण्यतिथीनिमित्त त्यांना विनम्र अभिवादन!

**– श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे ९९२२५४६२९५**



# वेळेचा अपव्यय, न्यायाला विलंब: तोंडी युक्तिवादावर कठोर वेळेची मर्यादा




न्याय मिळण्यास उशीर होऊ शकत नाही, या शब्दात भारताचे सरन्यायाधीश सूर्यकांत यांनी तोंडी युक्तिवादावर कठोर वेळेची मर्यादा जाहीर केली आहे, ज्याचे नोटरी असोसिएशनचे कार्याध्यक्ष ड. महेश एस. धन्नावत यांनी स्वागत केले आहे. त्यांनी म्हटले आहे की, सर्वोच्च न्यायालयाचा हा निर्णय केवळ स्वागतार्ह नाही, तर तो जिल्हा आणि सत्र न्यायालयांमध्येही तातडीने लागू करण्याची गरज आहे. कारण सामान्य आणि गरीब पक्षकारांचा खरा संघर्ष तिथेच सुरू होतो.

गुरुवारी, सर्वोच्च न्यायालयाने न्याय मिळण्यातील एका गंभीर समस्येवर बोट ठेवले. सरन्यायाधीश सूर्यकांत यांनी निरीक्षण नोंदवले की, न्यायालयीन वेळेच्या असमान वापरामुळे अनेकदा गरीब आणि सामान्य पक्षकार ऐकले जात नाहीत. जे जास्त वेळ युक्तिवाद करू शकतात त्यांच्यासाठी न्याय राखीव असू शकत नाही, असे ठाम मत मांडत, सरन्यायाधीशांनी सर्वांसाठी निष्पक्षता सुनिश्चित करण्यासाठी न्यायालयीन कामकाजात शिस्त आणण्याची गरज अधोरेखित केली.

ड. धन्नावत यांनी यावर प्रतिक्रिया देताना सांगितले की, सरन्यायाधीशांनी मांडलेली भूमिका अगदी योग्य आहे. अनेकदा, मोठ्या आणि हाय-प्रोफाइल खटल्यांमध्ये ज्येष्ठ वकील तासनतास युक्तिवाद करतात, ज्यामुळे लहान पण महत्त्वाच्या प्रकरणांना, जसे की जामीन अर्ज किंवा नुकसान भरपाईच्या याचिका, पुढे ढकलले जाते. न्यायालयीन वेळ ही एक मर्यादित सार्वजनिक संपत्ती आहे आणि तिचा असा असमान वापर सामान्य माणसाच्या न्यायाच्या हक्कावर गदा आणतो.

**प्रकरणाचा अभ्यास: एका विधवेचा २ दशकांचा संघर्ष**

सरन्यायाधीश सूर्यकांत यांनी एका गरीब विधवेचे उदाहरण दिले, जिच्या पतीचा रेल्वे अपघातात मृत्यू झाला होता. दावा जिंकूनही तिला दोन दशकांनंतर नुकसान भरपाई मिळाली. तोपर्यंत तिचा न्यायव्यवस्थेवरील विश्वास उडाला होता. तिला एका दुर्गम गावात शोधून, तिचे बँक खाते उघडून नुकसान भरपाईची रक्कम देण्यासाठी न्यायालयाला विशेष प्रयत्न करावे लागले. ड. धन्नावत म्हणाले, हे उदाहरण हृदयद्रावक आहे आणि तेच व्यवस्थेचे वास्तव दर्शवते. विलंबाने मिळालेला न्याय हा अन्यायच असतो.

**आंतरराष्ट्रीय स्तरावर तोंडी युक्तिवादाची वेळमर्यादा**

जगातील अनेक देशांमध्ये आणि आंतरराष्ट्रीय न्यायालयांमध्ये तोंडी युक्तिवादासाठी निश्चित वेळमर्यादा आहे. उदाहरणार्थ, आंतरराष्ट्रीय न्यायालयात (खउग) आणि रवांडासाठीच्या आंतरराष्ट्रीय गुन्हेगारी न्यायाधिकरणाने तोंडी आणि लेखी युक्तिवादासाठी शब्द आणि वेळेची मर्यादा निश्चित केली आहे. अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयातही प्रत्येक बाजूला साधारणपणे ३० मिनिटांचा वेळ दिला जातो. या पद्धतींमुळे प्रकरणांवर अधिक लक्ष केंद्रित करता येते आणि वेळेवर निकाल देणे शक्य होते.

**नवीन नियम आणि त्याचे परिणाम**

जानेवारी २०२६ पासून सर्वोच्च न्यायालयात तोंडी युक्तिवादावर कठोरपणे नियंत्रण ठेवले जाणार आहे. वकिलांना त्यांचा लेखी युक्तिवाद आगाऊ सादर करावा लागेल आणि तोंडी युक्तिवादासाठी किती वेळ हवा आहे, हे स्पष्टपणे सांगावे लागेल. अंतिम सुनावणीसाठी सूचीबद्ध प्रकरणांमध्ये स्थगिती दिली जाणार नाही आणि घोषित वेळेच्या मर्यादेचे काटेकोरपणे पालन केले जाईल. ड. धन्नावत यांनी या निर्णयाचे समर्थन करताना म्हटले की, ही शिस्त केवळ सर्वोच्च न्यायालयापुरती मर्यादित राहू नये. जिल्हा आणि सत्र न्यायालयांमध्येही याची अंमलबजावणी होणे अत्यंत आवश्यक आहे, जिथे प्रकरणांची संख्या प्रचंड आहे आणि सामान्य नागरिक न्यायाच्या प्रतीक्षेत खितपत पडला आहे. यामुळे केवळ वेळेची बचत होणार नाही, तर न्यायव्यवस्थेवरील लोकांचा विश्वासही दृढ होईल.

त्यांनी पुढे असेही सुचवले की, कनिष्ठ न्यायालयांमध्ये केस मॅनेजमेंटच्या सुनावणी वेळीच दोन्ही बाजूंच्या वकिलांसाठी युक्तिवादाची वेळ निश्चित केली पाहिजे. यामुळे अनावश्यक विलंब टाळता येईल आणि खटल्यांचा निपटारा वेगाने होण्यास मदत होईल. हा बदल सामान्य पक्षकारांचे हक्क जपण्यासाठी आणि न्याय वाजवी वेळेत मिळवण्यासाठी अत्यंत महत्त्वाचा ठरेल, असे मत त्यांनी व्यक्त केले.

- Dhannawat Law -ssociates
-dv. Mahesh S. Dhannawat
B.com, L.L.M², G.D.C. -.
Ex- Vice President
Jalna Dist. Bar -ssociation.
-dd: Shivkrupa, Kalikurti,
Dr. R P Road, Jalna (MH) 431203
Mob. 9326704647 / 02482-233581
dhannawat.maheshgmail.com

# भारतीय शेतकरी जीवनातील सामाजिक संकटांची हकीकत

२३ डिसेंबर हा दिवस आपल्या देशात राष्ट्रीय शेतकरी दिन (छरींळेपरश्र ऋरीशीी ऊू) म्हणून साजरा केला जातो, कारण शेतकरी हा आपल्या सामाजिक-आर्थिक व्यवस्थेचा पाया आहे व देशाच्या अन्नसुरक्षेपासून ते सांस्कृतिक गुरुत्वापर्यंत अशा अनेक पैलूंमध्ये त्यांचा महत्त्वाचा वाटा आहे. परंतु ताज्या National Crime Records Bureau (NCRB) च्या २०२३ च्या -ccidental Deaths and Suicides in India या अहवालानुसार शेती व कृषीक्षेत्राशी संबधित हजारो लोकांनी आत्महत्या केल्याची घटना आपल्या सामाजिक-आर्थिक हिताच्या अंतर्गत गंभीर विचारण्यास भाग पाडते. या अहवालानुसार वर्षभरात १०,७८६ शेती क्षेत्राशी संबंधित लोकांनी आत्महत्या केली आहे जेथे ४,६९० शेतकरी आणि ६,०९६ शेती मजूर यांचा समावेश आहे, आणि हे आकडे देशातील एकूण १,७१,४१८ आत्महत्यांपैकी सुमारे ६.३% इतका भाग आहे, म्हणजे रोज सरासरी जवळपास २९ ते ३० शेतकरी किंवा शेती मजूर आपल्या जीवनाचा निरोप घेत आहेत, आणि या आकडेवारीतील सामाजिक अर्थाचा अंतर्भाव आपल्याला शेतकरी समुदायाच्या जीवनातील खोल सामाजिक समस्यांकडे समजूतदारपणे पाहण्यास भाग पाडतो. या NCRB अहवालातील आकडे लिंगानुसार विभागले असता लक्षात येते की शेतकरी व शेती मजूर समुदायातील आत्महत्यांमध्ये पुरुषांची संख्या जास्त दिसते. आकडेवारीनुसार ४,६९० शेतकऱ्यापैकी ४,५५३ पुरुष व १३७ महिला शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत, तसेच ६,०९६ शेती मजूरांपैकी ५,४३३ पुरुष व ६६३ महिला शेती मजुरांनी आत्महत्या केली आहे, आणि या विभाजनातून आपण पाहू शकतो की शेतकरी समाजातील पुरुष आणि महिला दोघांवरही विविध स्वरूपांचे सामाजिक व आर्थिक तणाव परिणाम करीत आहेत. पुरुष शेतकऱ्यांवर सामाजिक प्रतिष्ठा, कुटुंबाची आर्थिक जबाबदारी, पिकांचे उत्पन्न आणि घराचा भरणा यासारख्या मानसिक दबावाचे भार अधिक स्पष्टपणे दिसतो, तर महिला शेतकरी व मजुरांना त्यांच्या कुटुंबातील भूमिकांबरोबरच आर्थिक सहभाग आणि सामाजिक मनोवैज्ञानिक ताण यांचा तडाखा भोगावा लागतो, ज्यातून आत्महत्येच्या घटनांचा सामाजिक-मानसिक संदर्भ अधिक गुंतागुंतीचा बनतो.

राज्यवार आकडे पाहिले असता, आपले महाराष्ट्र हे राज्य छउठइ अहवालानुसार सर्वाधिक आत्महत्यांच्या घटनांमध्ये अग्रस्थानावर आहे, जिथे सुमारे ३८.५% शेती क्षेत्राशी संबंधित आत्महत्यांचे प्रकरणे महाराष्ट्रातून नोंदली गेली आहेत, त्यानंतर कर्नाटक (२२.५%), आंध्र प्रदेश (८.६%), मध्य प्रदेश (७.२%) आणि तमिळनाडू (५.९%) अशा राज्यांमध्ये ही संख्या महत्त्वाची आहे, आणि या आकड्यांमधून हे स्पष्ट होते की कृषीप्रधान राज्यांमध्ये शेतकरी व शेती मजूर समुदायाच्या सामाजिक-आर्थिक समस्यांनी गंभीर स्वरूप धारण केले आहे, जे ग्रामीण जीवनातील परिस्थितीच्या विविध पैलूंशी जुळलेले आहेत. NCRB अहवालानुसार आत्महत्यांच्या या घटनांमध्ये वार्षिक उत्पन्न १,००,०००पेक्षा कमी असलेल्या लोकांचा वाटा सुमारे ६६.२% इतका आहे, आणि या आकड्यामुळे आर्थिक असुरक्षा हा शेतकरी जीवनातील एक महत्त्वाचा घटक असल्याचे स्पष्ट होते, कारण अनेक शेतकरी आपल्या उत्पन्नावर अवलंबून असतात आणि त्यांच्या वार्षिक उत्पन्नातील कमी पडलेले प्रमाण त्यांच्या कुटुंबीय खर्च, उत्पादन खर्च, कर्जाची परतफेड आणि सामाजिक आवश्यकतांसोबत सरेखित होत नाही, ज्यामुळे आर्थिक तणाव वाढतो आणि तो सामाजिक प्रतिष्ठा व मानसिक स्वास्थ्यावर खोल परिणाम करतो. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून विश्लेषित केल्यास शेतकरी आत्महत्यांचा प्रश्न केवळ आर्थिक संकटापुरता मर्यादित नसून, तो सामाजिक संरचनेतील खोल समस्यांचे प्रतिबिंब आहे, कारण शेतकरी समुदायाच्या जीवनात सामाजिक प्रतिष्ठा, समुदायातील स्थान, कुटुंबीय जबाबदाऱ्या, कर्जाचा दबाव, बाजार भावातील अनिश्चितता, हवामानातील बदल, पिकांचे नुकसान व सामाजिक सुरक्षा यंत्रणेचा अभाव हे सर्व घटक एकत्रितपणे त्यांच्या मानसिक अवस्थेवर हे गंभीर



प्रभाव टाकतात. त्यामुळे हा विषय व्यक्तिगत वृत्तीचा प्रश्न नाही तर सामाजिक-आर्थिक संरचनात्मक अस्तित्वाचा प्रश्न आहे. सामाजिक प्रतिष्ठा हा भारतीय ग्रामीण क्षेत्रातील एक महत्त्वाचा घटक आहे, ज्याचा प्रभाव शेतकऱ्याच्या सामाजिक जीवनावर, कुटुंबीय नात्यावर आणि समुदायातील स्थानावर दिसून येतो, आणि जेव्हा आर्थिक परिस्थिती व सामाजिक अपेक्षांमध्ये विसंगती निर्माण होते, तेव्हा तो मानसिक ताणात बदलतो. या ताणाचा परिणाम त्यांच्या निर्णय प्रक्रियेतून गंभीर निर्णयाकडे वळू शकतो, ज्यामध्ये आत्महत्याकडे वळण्याची शक्यता वाढते, कारण सामाजिक प्रतिष्ठा, घरातील आर्थिक स्थिती आणि सामाजिक अपेक्षांचा संयुक्त प्रभाव त्यांच्या चिंतनात प्रमुख भूमिका बजावतो. ग्रामीण समाजातील पारंपारिक सामाजिक संरचना, जिथे शेतकरी समुदाय सामाजिक-सांस्कृतिक मूल्ये, परंपरा आणि सामाजिक सहयोग यावर आधारित असतो, आता बदलत्या आर्थिक युगात अधिक आव्हानात्मक बनत आहे, कारण आर्थिक दबावाने पारंपारिक सामाजिक समर्थन प्रणाली कमजोर होत आहे. शेतकरी कुटुंबातील पुरुष व महिला दोघांनाही विविध सामाजिक अपेक्षांचा सामना करावा लागतो आणि या अपेक्षांचे ताण त्यांच्या मानसिक स्वास्थ्यावर नकारात्मक परिणाम करतात. पुरुष शेतकरी, विशेषतः घरातील एक उत्पन्नकर्ता म्हणून, आर्थिक दबाव, कर्जाचे वाढते दडपण आणि कुटुंबीय अपेक्षा यांचा अत्यधिक ताण अनुभवतात, तर महिला शेतकरी व शेती मजूरांना कुटुंब, घरकाम आणि सामाजिक जबाबदाऱ्यांचा तणाव जास्त जाणवतो. त्यामुळे दोन्ही लिंगांमध्ये मानसिक ताणाचे स्वरूप वेगवेगळे असले तरी परिणाम हे सामाजिक आणि व्यक्तिगत दोन्ही स्तरावर खोलवर दिसतात.

श्रमाचे स्वरूप व शेतकरी आयुष्याचा नैसर्गिक अवलंबित्व यामुळे, हवामानातील बदल, पर्जन्याचे अनियमित स्वरूप, पिकांचे अपयश व उत्पादन खर्चातील वाढ हे सर्व शेतकऱ्यांच्या जीवनात (Economic risk) आर्थिक जोखीम वाढवतात. ज्या परिस्थितीत शेतकरी पावसावर विश्वास ठेवून पिके पेरतात आणि पावसाळ्यातील अनियमित पावसामुळे पिकांचे नुकसान होते, तेव्हा त्यांची आर्थिक स्थिती गंभीर संकटात येते. यासोबतच बाजारभाव कमी मिळाल्यास पिक उत्पादनाच्या खर्चाची भरपाईही होत नाही आणि त्यामुळे उत्पन्नात मोठी घट होते. अशा परिस्थितीत अनेक शेतकरी कर्जाच्या ओझ्यात अडकतात आणि कर्जाची परतफेड करण्यासाठी त्यांना मानसिक दबाव आणि सामाजिक प्रतिष्ठेतील ताणाला सामोरे जावे लागते, ज्यामुळे त्यांच्या जीवनात मानसिक सामाजिक असुरक्षा वाढते. हे सर्व घडताना सामाजिक समर्थन, समुदायाचा सहभाग, शेतकऱ्याना शाळा, शिक्षण व आरोग्य सुविधा यांचा अभाव ही समस्या आणखी जटिल करते.

शेतकरी आत्महत्यांचा तपशील पाहिल्यास लक्षात येते की केवळ कर्ज हे एकमेव कारण नसून असे अनेक सामाजिक आणि मनोवैज्ञानिक कारणे आहेत ज्यांचा परिणाम आत्महत्यांचे आकडे वाढवण्यात दिसतो. ग्रामीण समाजात आर्थिक संकट व सामाजिक प्रतिष्ठेच्या ताणामुळे, व्यक्ती मनोवैज्ञानिकदृष्ट्या निष्काळजीपणा आणि निराशा यांना सामोरे जातात. सामाजिक स्वीकार, आत्म-आदर, कुटुंबातील भूमिका आणि समाजातील स्थान हे घटक त्यांच्या मानसिक स्थितीवर प्रभाव टाकतात. जेव्हा शेतकरी आर्थिक दृष्ट्या कमजोर असतो आणि सामाजिक प्रतिष्ठा धोक्यात येते, तेव्हा मानसिक तणाव व सामाजिक दबाव यांचा एकत्रित परिणाम त्यांच्या मानसिक स्वास्थ्याला गंभीर आव्हान देतो, ज्यामुळे आत्महत्येच्या घटनांची शक्यता वाढते.

ग्रामीण भागातील सामाजिक-आर्थिक असमानता, पायाभूत सुविधा व सामाजिक सुरक्षा यंत्रणांचा अभाव, आरोग्य व शिक्षण सुविधांचा मर्यादित विस्तार, सूचना व प्रशिक्षणाची कमतरता, महिला व पुरुष शेतकऱ्यांमध्ये उपलब्ध संसाधनांचा फरक आणि सामाजिक सहभाग यांचा परिणाम त्यांच्या जीवनातील मानसिक प्रश्नांवर दिसून येतो. जिथे सामाजिक-संस्कृतिक वातावरण मजबूत आहे, तिथे सामाजिक समर्थन, समुदायातील सहकार आणि पारिवारिक आधार यामुळे शेतकऱ्यांना मानसिक ताणातून बाहेर पडण्याची अधिक क्षमता असते, परंतु जिथे सामाजिक एकांतता, आर्थिक दबाव आणि समर्थनाचा अभाव आहे, तिथे शेतकरी व मजूर समुदायाला आत्महत्यांकडे वळण्याचा अधिक धोका जाणवतो. ग्रामीण समाजातील सामाजिक नेटवर्क आणि पारंपारिक सहायता पद्धतींचा परिणाम आत्महत्यांच्या घटनांवर नकारात्मक स्वरूपात दिसतो, कारण जोपर्यंत सामाजिक, आर्थिक व मानसिक आधार मजबूत होत नाही, तोपर्यंत व्यक्ती स्वतःच्या स्थितीशी संघर्ष करत असतात, आणि शेवटी हा संघर्ष त्यांच्या मानसिक स्वास्थ्यावर गंभीर परिणाम दर्शवतो.

शेतकऱ्यांच्या आत्महत्यांच्या घटनांमागील सामाजिक मूल्यांचे विश्लेषण हे आपल्याला सांगते की सामाजिक निर्बंध, पारंपारिक प्रतिष्ठा, कुटुंबीय अपेक्षा, आर्थिक जबाबदाऱ्या आणि सामाजिक-मानसिक दबाव हे सर्व घटक एका गुंतागुंतीच्या संयोगातून त्यांच्या जीवनावर दबाव टाकतात. ग्रामीण समाजात आर्थिक संधींचा अभाव, सामाजिक सुरक्षा व विमा या यंत्रणांचा अपुरा विस्तार, मानसिक समुपदेशन सुविधा नाहीत किंवा मर्यादित आहेत, त्यामुळे शेतकऱ्यांना त्यांच्या मानसिक संघर्षाचे मुक्तपणे भाष्य करण्याची व उपाय शोधण्याची संधी कमी मिळते. यामुळे त्यांना आयुष्यातील समस्यांचा सामना करताना त्यांच्या वैयक्तिक व सामाजिक प्रतिष्ठेच्या ताणाशी जुळवून घ्यावे लागते, आणि हे संघर्ष त्यांच्या मानसिक स्थितीवर खोल परिणाम करतात ज्यातून आत्महत्या सारख्या चरम निर्णयाकडे वळण्याची प्रवृत्ती वाढते.

शेतकरी आत्महत्यांच्या आकड्यांमागील सामाजिक प्रतिमांचा अभ्यास करताना असे दिसून येते की आर्थिक धोरणे, बाजार व्यवस्था, शासकीय योजना, कृषी विमा, न्यूनतम समर्थन मूल्य आणि तज्ज्ञ मार्गदर्शन यांचा प्रत्यक्ष परिणाम जमिनीवर कसा लागू होत आहे, हेही महत्त्वाचे आहे. अनेक वेळा योजनांचे प्रत्यक्ष कार्यान्वयन, पारदर्शकता, वैयक्तिक व सामाजिक मतभेद, स्थानिक प्रशासनाची कार्यक्षमता यांचे मिश्रित परिणाम शेतकऱ्यांच्या जीवनात दिसतात. कृषी विमा योजना प्रत्यक्षात उपयोगी पडत नाहीत किंवा तितक्या परिणामकारकपणे लागू होत नाहीत, MSP चा लाभशून्य होतो, कर्ज परतफेडीची वेळ व व्याज यांचा दबाव वाढतो, आणि उत्पादन खर्चाचा भार अधिकच वाढतो. यामुळे शेतकऱ्यांच्या जीवनातील अनिश्चितता आणि तणाव हे वाढते आणि सामाजिक प्रतिष्ठा व आत्म-आदर यांच्यात विरोधाभास निर्माण होतो, ज्याचा मानसिक स्वास्थ्यावर गंभीर परिणाम होतो. राष्ट्रीय शेतकरी दिन हा दिवस आमच्या समाजाला एक चिंतनात्मक व व्यापक दृष्टीकोनातून शेतकऱ्यांचे जीवन, आर्थिक तणाव, सामाजिक प्रतिष्ठा आणि मानसिक स्वास्थ्य यांच्यातील जटिल नाते समजून घेण्याची संधी देतो. हा दिवस आपल्याला स्मरण करून देतो की शेतकरी समुदाय केवळ अन्नाचे उत्पादक नाही, तर सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक आणि मानसिक दृष्टिकोनातून आपला समाज टिकविणारा पाया आहे. त्यांच्या समस्यांचे निराकरण फक्त आर्थिक उपाययोजना किंवा कृषी सुधारणा पुरते मर्यादित नसून, सामाजिक सुरक्षा, मानसिक आरोग्य सेवा, शिक्षण व प्रशिक्षण, पायाभूत सुविधा, आर्थिक समावेशन, सामाजिक सहभाग व पिकांच्या बाजारभावाचे संरक्षण यांचा एक समग्र दृष्टिकोन आवश्यक आहे. ग्रामीण भागातील सामाजिक नेटवर्क, समुदाय आधारित सहयोग, आरोग्य व मनोवैज्ञानिक समर्थन, कुटुंबीय सल्ला, समुपदेशन, महिला सक्षमीकरण आणि सामाजिक न्याय हे सर्व घटक एकत्रितपणे शेतकऱ्यांना स्थिर व सकारात्मक भवितव्याकडे मार्गदर्शन करू शकतात. शेवटी, राष्ट्रीय शेतकरी दिन हा दिवस आपल्या सामाजिक धारणा व मूल्यांना नव्याने परिभाषित करण्याची, शेतकऱ्यांना सन्मान, सुरक्षा, प्रतिष्ठा आणि गरिमापूर्ण जीवनमान देण्याची एक सामाजिक व नैतिक जबाबदारी आहे. शेतकरी संकट हे फक्त कृषीशी निगडीत समस्या नाही, तर सामाजिक-मानसिक-आर्थिक समग्र समस्या आहे, आणि त्याचे निराकरण करण्यासाठी शासन, समाज, शैक्षणिक संस्था, स्वयंसेवी संस्था आणि सरसकट नागरिकांनी एकत्र येऊन व्यापक सामाजिक व धोरणात्मक उपाययोजना आखणे आवश्यक आहे. राष्ट्रीय शेतकरी दिन आपल्याला हे स्मरण करून देतो की शेतकऱ्यांचे जीवन, त्यांचे ध्येय आणि त्यांच्या संघर्षाचे सामाजिक परिणाम हे आपल्या सर्वांचे कल्याण आणि प्रगती यांना जोडलेले आहेत, आणि त्या दिशेने सामाजिक न्याय, आर्थिक सुरक्षा व मानसिक आरोग्य सुनिश्चित करणे हे आपल्या सर्वांचे सामूहिक कर्तव्य आहे.

**– डॉ. राजेंद्र बगाटे** (लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत), ईमेल – bagate.rajendra5gmail.com

# फुलंब्री नगरपंचायत महाविकास आघाडीच्या ताब्यात

## नगराध्यक्ष पदाचे उमेदवार राजेंद्र ठोंबरे तब्बल १७९७ मतांनी विजय, भाजपाचे सुहास शिरसाठ यांचा दारुण पराभव

**आत्ताच एक्सपप्रेस**

**फुलंब्री तालुका प्रतिनिधी/ सरफराज पटेल/** फुलंब्री नगरपंचायती च्या निकालात महाविकास आघाडीचे उमेदवार शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे राजेंद्र ठोंबरे नगराध्यक्ष पदासाठी तब्बल १७९७ मतांनी विजय झाला. फुलंब्रीत एकुण मतदान आह,१७६३० यापैकी १४८०३ एकुण ८३.९६% टक्के मतदान झाला होता , महाविकास आघाडीचे उमेदवार शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे राजेंद्र ठोंबरे यांना ८२१४ मत तर

महायुती भाजपा चे उमेदवार सुहास शिरसाठ यांना ६४१७ व मतीन पटेल ९३ मत पडले. अशी मत पडली, फुलंब्री नगरपंचायती ची निवडणुक अती तटीची झाली होती, फुलंब्री च्या तहसील कार्यालय वर काल दिनांक २१ डिसेंबर २०२५ रोजी तहसीलदार तथा निवडणुक निर्णय अधिकारी योगिता खटावकर मुख्याधिकारी ज्ञानेश्वर ठोंबरे व निवडणुक अधिकारी यांनी विजयीची घोषणा केली.

निवडणुक निकालाचे निकाल जस जसे हाती येत होते, तस तसे महाविकास आघाडीचे कार्यकर्ते जल्लोष करत होते. फुलंब्री च्या तहसील कार्यालय पासुन तर शहरात महाविकास आघाडी चे नेते व कार्यकर्त्यांनी डीजे लावत जल्लोष साजरा केला. विजयी उमेदवार राजेंद्र ठोंबरे व विजयी नगरसेवकांनी शहरात विजय मिरवणुक काढली होती. आभार व्यक्त करत मनोगत व्यक्त केले, याचा श्रेय फुलंब्रीच्या जनतेला दिला.

फुलंब्री नगरपंचायती मध्ये महाविकास आघाडीचे १२ उमेदवार निवडुण आले तर महायुती भाजपा चे ५ उमेदवार निवडुन आले. यापैकी सर्वाधिक शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे ७ नगरसेवक तर भाजपा चे ५ नगरसेवक काँग्रेसचे ४ नगरसेवक राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्ष १ नगरसेवक असे एकुण १७ उमेदवार निवडुन आले.

महाविकास आघाडीच्या ताब्यात फुलंब्री नगरपंचायत गेल्याने भाजपा चा दारुण पराभव झाला .जालना लोकसभेत भाजपा ला धक्का बसला आता नगरपंचायती मध्ये धक्का बसला, भाजपाचे माजी आमदार हरिभाऊ बागडे यांचा बालेकिल्ला समजला जाणारा आता त्या बाले किल्लयाला महाविकास आघाडीने सुरुंग लावला. भाजपा च्या आमदार अनुराधा चव्हाण यांनी ग्राउंड लेवल वर लक्ष न दिल्याचे सांगितले जात आहे.

यामध्ये औरंगाबाद चे माजी खासदार चंद्रकांत खैरे, अक्षय खेडकर, कोंग्रेस चे तालुका अध्यक्ष संतोष मेटे, सुभाष पाटील, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे फुलंब्री तालुका प्रमुख सोमिनाथ पाटील करपे यांच्या सह आदींनी रैलीत सहभागी झाले होते. शहरातील जेष्ठ नेते तथा माजी सरपंच अशफाक पटेल, अजगर पटेल, महमु पटेल, मोबीन पाशा, फयाज पटेल, माजी नगरसेवक आसेफ पटेल, हरिदास घरमोडे, आकाश गंगावणे, जुबेर चिश्ती, पत्रकार सरफराज पटेल यांच्या सह आदींची उपस्थिती होती.



**फुलंब्री नगरपंचायती मध्ये महाविकास आघाडीने दणदणीत विजय झाल्याने,शहरात रैली काढताना महाविकास आघाडीचे नेते व कार्यकर्ते सहभागी झाले . यावेळी नगराध्यक्ष पदाचे उमेदवार राजेंद्र ठोंबरे, महमु पटेल मोबीन पाशा फयाज पटेल माजी सरपंच अशफाक पटेल, हाफीस रज्जाक यांच्या सह आदी नेते व कार्यकर्ते सहभागी झाले होते.**

### खालील उमेदवार

**वार्ड १)** काँग्रेस – खान अरसिया रिजवान – ३८७ विजय
भाजपा – मीना ढोके – ३५६ पराभुत
**वार्ड २)** शिवसेना ठाकरे – पुजा घडामोडे १३० पराभुत
भाजपा द्रवारका जाधव ६६६ – विजय
**वार्ड ३** राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार कुरैशी हालीमाबी मजीद – ३२९ , विजय
भाजपा अश्विनी ढोके – १७४ , पराभुत
**वार्ड ४)** काँग्रेस जमीर पठाण – ३८० , विजय
भाजपा रऊफ पटेल –१६७ , पराभुत
**वार्ड ५ )** काँग्रेस हिना पटेल ६६९ – विजय
राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार बिस्मिल्लाह जफर २५१ पराभुत
**वार्ड ६ )** जावेद खान शिवसेना उबाठा – ७२५ विजय
राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार योगेश सोनवणे – १९७ पराभुत
**वार्ड ७)** शिवसेना उबाठा मसरत जफर चिश्ती –४४८ विजय
भाजपा मीराबाई काथार – ४०८ पराभुत
**वार्ड ८)** भाजपा योगेश मिसाळ – ८५७ विजय
शिवसेना ठाकरे नरेंद्र सिमंत – १३४ , पराभुत
**वार्ड ९)** शिवसेना ठाकरे सुषमेश प्रधान ४५८ विजय
भाजपा सुमित प्रधान –३२९ , पराभुत
**वार्ड १०** भाजपा वाल्मीक जाधव – ४९६ , विजय
शिवसेना ठाकरे हरिदास घडामोडे – ४६२ पराभुत
**वार्ड ११** शिवसेना ठाकरे अर्चना दुतोंडे ५२८ विजय
भाजपा आशा शिंगारे २४० पराभुत
**वार्ड १२)** भाजपा गणेश राऊत – ६४९ विजय
शिवसेना ठाकरे सांडु हापत – २६० पराभुत
**वार्ड १३)** शिवसेना ठाकरे राणी घोडके – ४०२ विजय
भाजपा शारदा शेरकर – ३७७ पराभुत
**वार्ड १४)** भाजपा देविदास ढंगारे –७०० विजय
शिवसेना ठाकरे मनोज कुदळे २०३ पराभुत
**वार्ड १५** काँग्रेस प्रशांत नागरे – ६६१ विजय
भाजपा गजानन नागरे ३२२ – पराभुत
**वार्ड १६)** शिवसेना ठाकरे सना शेख – ४२७ विजय
भाजपा लीलाबाई नागरे –२०८ , पराभुत
**वार्ड १७ )** शिवसेना ठाकरे शहा अन्नोबी जमील – ४६५ विजय
भाजपा सायमा कुरैशी – २१५ पराभुत

## संक्षिप्त

### नेतृत्वाअभावी नगरपंचायत निवडणुकीत विरोधकांचा धुव्वा-हेमंत पाटील

**आत्ताच एक्सपप्रेस**

**पुणे / प्रतिनिधी** / स्थानिक पातळीवरील नेतृत्वाअभावी नगरपंचायतीच्या निवडणुकीत देखील विरोधकांचा पार धुव्वा उडाला. विशेष म्हणजे राज्यासह स्थानिक पातळीवर देखील मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवत राज्यातील जनतेने भाजपला मोठा कौल दिला, असे प्रतिपादन इंडिया अगेन्स्ट करप्शनचे राष्ट्रीय अध्यक्ष आणि ओबीसी नेते हेमंत



पाटील यांनी सोमवारी (ता.२२) व्यक्त केले. प्रभावी नेतृत्व आणि स्थानिक पातळीवरील संघटनात्मक पकड घट्ट केली नाही; तर आगामी महानगर पालिका निवडणुकीत देखील विरोधकांचे पानिपत होईल, असे मत पाटील यांनी व्यक्त केले .

भाजपने यंदा १२९ अर्थात जवळपास ४५% नगरपालिकांवर भगवा झेंडा फडकवला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि एकनाथ शिंदे यांनी काही ठिकाणी वगळता इतर नगरपालिका, नगरपंचायतीच्या निवडणूक लढवून महायुती म्हणून २८८ पैकी २१५ नगरपालिका जिंकल्या आहेत. हे यश महायुतीच्या कारभारावर जनतेने व्यक्त केलेला विश्वास दाखवणारा आहे, असे मत पाटील यांनी व्यक्त केले.

यंदाच्या निवडणुकीत भाजपचे ३ हजार २२५ नगरसेवक निवडून आले आहेत. २०१७ मध्ये भाजपने १ हजार ६०२ जागा जिंकल्या होत्या. यंदा भाजप चा स्ट्राईक रेट ४७.८२ टक्क्यांनी अधिक आहे. महीयुतीने एकूण ६ हजार ९५२ जागांपैकी ४३३१ जागा जिंकल्या. जवळपास ६२.३० टक्के नगरसेवक महायुतीचे निवडून आले आहेत. विरोधकांनी विशेष: काँग्रेसने ४१ नगराध्यक्ष आणि १ हजार ६ नगरसेवक निवडून आले असल्याचा दावा केला आहे. शिवसेना ६९५, राष्ट्रवादी ३११, शिवसेना ठाकरे गट ३७८, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गट १५३ व १४० इतर नगरसेवक राज्यात निवडून आले आहेत, असे पाटील म्हणाले.

### 'कायद्याचे पालन करून जबाबदार नागरिक बना' ; नूतन विद्यालयात कायदेविषयक मार्गदर्शन शिबीर संपन्न




**आत्ताच एक्सपप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर / प्रतिनिधी** / येथील हडको परिसरातील नूतन बहुउद्देशीय माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात १८ डिसेंबर २०२५ रोजी विधी सेवा प्राधिकरणाच्या वतीने 'कायदेविषयक मार्गदर्शन' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाचे उद्घाटन तथा प्रमुख पाहुणे मुख्य मार्गदर्शन मा. श्रीमती वैशाली पी. फडणीस (न्यायाधीश तथा सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण / जिल्हा व सत्र न्यायालय औरंगाबाद) यांनी केले. याप्रसंगी सिल्लोड शिक्षण संस्थेचे सचिव, डॉ. राहुल जनार्धन म्हस्के मा. सिनेट व व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छ.संभाजीनगर यांची विशेष उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे प्राचार्य भारत जे. म्हस्के होते.

**दैनंदिन जीवनातील कायद्यांचे महत्त्व :** विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना मा. न्यायाधीश वैशाली फडणीस यांनी दैनंदिन जीवनातील कायदे, महिलांचे हक्क, सायबर गुन्हेगारी, बाल हक्क व कायद्याचे महत्व यावर सविस्तर प्रकाश टाकला. त्या म्हणाल्या, विद्यार्थ्यांनी बालगुन्हेगारी, लैंगिक हिंसाचार आणि बालविवाहासारख्या प्रथांपासून सावध राहिले पाहिजे. 'चांगला स्पर्श आणि वाईट स्पर्श' यातील फरक ओळखून स्वतःचे संरक्षण करणे आवश्यक आहे. तसेच त्यांनी जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या कार्याची माहिती देऊन विद्यार्थ्यांना न्यायव्यवस्था हक्क व कर्तव्य या बाबत सखोल मार्गदर्शन केले. कायद्याबाबत जागरूक राहून जबाबदार नागरिक व्हावे, असे आवाहन केले.

**रस्ते सुरक्षा आणि वाहतूक नियम:** यावेळी ड. प्रतिभा गोसावी यांनी विद्यार्थ्यांना रस्ते सुरक्षेचे धडे दिले. हेल्मेट आणि सीटबेल्टचे महत्त्व सांगतानाच, कमी वयात मोटारसायकल चालवणे किती घातक ठरू शकते आणि त्याचे कायदेशीर परिणाम काय होतात, याची माहिती त्यांनी दिली. नियमांचे पालन केल्यानेच आपण सुरक्षित राहू शकतो, असे त्यांनी पटवून दिले.

**अध्यक्षीय मनोगत :** प्राचार्य भारत जे. म्हस्के यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात सांगितले की, कायदा हा समाजाचा कणा आहे. आपण सर्वांनी कायद्याचे पालन केले तर आपले जीवन सुखकर होईल. मुला-मुलींनी अभ्यासासोबतच आपल्या वर्तनाकडे लक्ष देऊन आई-वडिलांना त्रास होणार नाही, याची काळजी घेऊन कायद्याचे पालन केले पाहिजे. उपस्थिती: कार्यक्रमाचे प्रास्ताविक कमलाकर पाटील यांनी केले. या प्रसंगी मुख्याध्यापिका श्रीमती कविता साबळे, मच्छींद्र क्षीरसागर, स्वप्निल पवार, समाधान भालेराव, भगवान पाटील, पुरोषत्तम भिरूड, संजय बनकर, सीताराम महाजन, यांच्यासह सर्व शिक्षकवृंद, कर्मचारी आणि मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

# 'महाबीझ २०२६' जागतिक व्यवसाय संधींबाबत उद्योजकांना मार्गदर्शन!

## संभाजीनगर येथे बीबीएन ग्लोबलतर्फे व्यवसाय संवाद बैठक!

**आत्ताच एक्सपप्रेस**

**संभाजीनगर / प्रतिनिधी /**

बीबीएन ग्लोबलतर्फे संभाजीनगर येथे उद्योजकांसाठी व्यवसाय संवाद बैठक आयोजित करण्यात आली. यावेळी दुबई येथे ३१ जानेवारी व १ फेब्रुवारी २०२६ रोजी होणाऱ्या 'महाबीझ २०२६' या आंतरराष्ट्रीय व्यवसाय परिषदेची माहिती देण्यात आली. या परिषदेमुळे महाराष्ट्र – मराठवाड्यातील उद्योजकांना निर्यात – आयात, गुंतवणूक, आंतरराष्ट्रीय भागीदारी व जागतिक नेटवर्किंगच्या संधी उपलब्ध होणार असल्याचे जीएमबीएफ ग्लोबलच्या सदस्या प्रचिती तलाठी यांनी सांगितले.

या बैठकीस गल्फ महाराष्ट्र बिझनेस फोरमचे सदस्य दिलीप खेडेकर यांनी महाराष्ट्रातील उद्योजकांना आंतरराष्ट्रीय बाजारपेठांशी जोडण्यासाठी अशा संवादात्मक उपक्रमांचे महत्त्व त्यांनी यावेळी अधोरेखित केले. या बैठकीला जीएमबीएफ ग्लोबलच्या सदस्या प्रचिती तलाठी यांनी संबोधित केले. त्यांनी जीएमबीएफ ग्लोबल ही दुबईस्थित, ना – नफा व्यवसाय संघटना असून ती महाराष्ट्रातील उद्योजकांना दुबई, जीसीसी, मध्यपूर्व, आफ्रिका तसेच इतर जागतिक बाजारपेठांमध्ये व्यवसाय विस्तारासाठी संधी उपलब्ध करून देत असल्याचे स्पष्ट केले.




यावेळी त्यांनी महाबीझ २०२६ या आंतरराष्ट्रीय व्यवसाय परिषदेबाबत सविस्तर माहिती दिली. महाबीझ २०२६ ही ३१ जानेवारी आणि १ फेब्रुवारी २०२६ रोजी दुबई येथे आयोजित केली जाणारी द्वैवार्षिक जागतिक व्यवसाय परिषद आहे. या परिषदेत पंधराहून अधिक देशांतील सुमारे ८०० ते १००० प्रतिनिधी सहभागी होणार असून त्यामध्ये उद्योजक, गुंतवणूकदार, उद्योग संघटना, निर्यातदार, सेवा क्षेत्रातील व्यावसायिक आणि स्टार्टअप्स यांचा समावेश असेल.

संभाजीनगर आणि मराठवाडा विभागातील उद्योजकांसाठी 'महाबीझ २०२६' मधून दुबई आणि जागतिक बाजारपेठेत निर्यात-आयात व व्यवसाय विस्ताराच्या संधी, जॉइंट व्हेन्चर आणि आंतरराष्ट्रीय भागीदारी, गुंतवणूकदारांशी थेट संपर्क, जागतिक नेटवर्किंगद्वारे नवीन ग्राहक आणि व्यवसाय करार, स्थानिक उद्योगांना आंतरराष्ट्रीय स्तरावर ओळख मिळवण्याची संधी इत्यादी फायदे होणार असल्याचे त्यांनी सांगितले. पुढे बोलताना त्या म्हणाल्या योग्य व्यासपीठ, मार्गदर्शन आणि नेटवर्क उपलब्ध झाल्यास संभाजीनगरसारख्या शहरांतील उद्योजकही जागतिक पातळीवर यशस्वी होऊ शकतात, असे मत त्यांनी व्यक्त केले.

बैठकीदरम्यान उपस्थित उद्योजकांनी दुबईतील उद्योग वातावरण, स्टार्टअप संधी, व्यापार धोरणे आणि गुंतवणूक प्रक्रियेबाबत प्रश्न विचारले. या संवादामुळे जागतिक व्यवसाय विस्तारासाठी आवश्यक माहिती आणि प्रेरणा मिळाल्याचे उपस्थितांनी सांगितले. ही बैठक उद्योजकांसाठी माहितीपूर्ण, प्रेरणादायी आणि भविष्यातील आंतरराष्ट्रीय सहकार्यासाठी दिशादर्शक ठरल्याचे बीबीएनजीच्या श्रीधर कुलकर्णी यांनी नमूद केले. ही बैठक यशस्वी होण्यासाठी श्रीधर कुलकर्णी, श्री. सुजित पोतदार आणि अतुल ठाकूर यांचं सहकार्य लाभलं.

# अनेक स्त्रियांच्या आवाजला शब्दांचा खजिना देन्याचे काम कवी श्यामसुंदर मिरजकर यांनी केले:निलम माणगांवे

**आत्ताच एक्सपप्रेस**

**ईश्वरपूर प्रतिनिधी/ इकबाल पीरजादे /** आजच्या धर्मांध, विखारी वातावरणात सर्वांचेच चेहरे हरवले आहेत. वेगवेगळ्या भूमिका पार पाडताना चेहराच लक्षात राहू नये अशी स्थिती असताना आपली मते धाडसाने मांडायला हवीत. आपल्या धडावर आपलेच डोके असायला हवे. अनेक स्त्रियांच्या आवाजाला शब्द देण्याचे काम कवी श्यामसुंदर मिरजकर यांनी केले आहे, असे मत नीलम माणगांवे यांनी व्यक्त केले.

महाराष्ट्र साहित्य परिषद शाखा आणि नाग-नालंदा प्रकाशन यांच्या वतीने आयोजित कवी श्यामसुंदर मिरजकर लिखित चेहऱ्याच्या शोधात स्त्री या काव्यसंग्रहाच्या प्रकाशन समारंभात त्या बोलत होत्या. ज्ञानप्रबोधिनीचे अध्यक्ष शामराव पाटील, समीक्षक डॉ. नीलेश शेळके, डॉ. सुस्मिता खुटाळे, दीपक स्वामी प्रमुख उपस्थित होते. नीलम माणगावे म्हणाल्या, परकाया प्रवेशाचे उत्कृष्ट उदाहरण हा संग्रह आहे. पारंपारिक स्त्रीपासून आधुनिक स्त्रियांचा प्रवास संग्रहात आहे. कवितेने उपस्थित केलेले प्रश्न महत्त्वाचे आहेत. मनाच्या वेदनेला भावनेचा स्पर्श केला आहे. डॉ श्यामसुंदर मिरजकर म्हणाले, स्त्री जाणिवेच्या कविता लिहिताना परकाया प्रवेशाची अनुभूती लेखनात आली आहे.



**ईश्वरपूर कभी शामसुंदर बिराजदार लिखित चेहऱ्यांच्या शोधात स्त्री या काव्यसंग्रहाच्या प्रकाशन प्रसंगी नीलम माणगावे प्रा. शामराव पाटील निलेश शेळके, सुस्मिता खुटाळे एकनाथ पाटील शैलजा टिळे प्रा.दीपक स्वामी**

डॉ सुस्मिता खुंटाळे म्हणाल्या, सध्याच्या सैरभैर, असंवेदनशील काळात या कविता सूक्ष्म मानवी भावना टिपणाऱ्या आहेत. आधुनिक काळातील बंडखोरीचा स्वर आला आहे. घट्ट पुरुषसत्ताक परंपरेची वीण असलेल्या समाजातील हळव्या माणसांची आणि सहचराची संवेदना टिपली आहे. परंपरेत स्त्रियांना असलेल्या बंधनांचे ठोकताळे मोडता येतील का याचा शोध आहे. डॉ नीलेश शेळके म्हणाले, स्त्रीच्या जगण्याचा संपूर्ण सातबारा संग्रहात आहे. स्त्रीचा हरवलेला चेहरा, कुचंबणा, घुसमट, तणावचित्रे आलीहेत. आतून आलेल्या कोरडेपणाची अशांतता कवितेत आहे. स्वातंत्र्याचा मागणीस्वर आहे. अस्तित्वशोधाची नवी रूपे आहेत. आक्रस्ताळेपणा टाळून जीवनाशी जोडून राहण्याचा धागा कवितेत अनुभवाला येतो. एकनाथ पाटील यांनी प्रास्ताविक केले. अर्चना थोरात यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. लता ऐवळे यांनी सूत्रसंचालन केले. डॉ दीपक स्वामी यांनी आभार मानले. शैलजा टिळे, त्र्यंबकेश्वर मिरजकर आदींनी संयोजन केले.

# संक्षिप्त

## उमेदवारांचे नामनिर्देशन दाखल करतेवेळी अवलंब करावयाची कार्यपध्दती जाहीर

**आत्ताच एक्सपप्रेस**

**जालना/ प्रतिनिधी** / राज्य निवडणूक आयोगाने महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक -२०२५ साठी निवडणूक कार्यक्रम जाहीर केला आहे. निवडणूक कार्यक्रम जाहीर केल्याच्या दिनांकापासून आदर्श आचारसंहिता अंमलात आलेली आहे. भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम १६३ अन्वये शक्तीचा वापर करुन निवडणूकीचे कालावधीत जालना शहरातील महापालिका निवडणूकीची संपूर्ण प्रक्रिया शांततेत, निर्भय व न्याय वातावरणात पार पाडण्याच्या दृष्टीकोनातून निवडणूक कालावधीत निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कार्यालयात उमेदवारांनी नामनिर्देशनपत्र दाखल करतेवेळी त्यांच्या वाहनांच्या ताफ्यामध्ये तीनपेक्षा जास्त मोटारगाड्या/वाहने यांचा ताफ्यात समावेश नसावा. तसेच उमेदवारांनी नामनिर्देशनपत्र दाखल करतेवेळी निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयाचे १०० मीटर परिसरात तसेच निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कार्यालयाचे अवारात फक्त उमेदवार, सूचक/अनूमोदक अथवा दोन व्यक्ती यांना परवानगी दिली जाईल. तसेच निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयात नामनिर्देशनपत्र दाखल करतेवेळी कार्यालयाच्या परिसरात मिरवणूक/सभा घेणे, कोणत्याही प्रकारच्या घोषणा देणे/वाद्य वाजविणे किंवा गाणी म्हणणे आणि कोणत्याही प्रकारचा निवडणूक प्रचार करणेस प्रतिबंध करण्यात आला आहे. असे आदेश जिल्हादंडाधिकारी आशिमा मित्तल यांनी जारी केले आहेत.

## शासकीय, निमशासकीय कार्यालये, विश्रामगृह परिसरात मिरवणूका काढणे, घोषणा देण्यास निर्बंध

**आत्ताच एक्सपप्रेस**

**जालना/ प्रतिनिधी** / राज्य निवडणूक आयोगाने महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक -२०२५ साठी निवडणूकीचा कार्यक्रम जाहीर केला आहे. निवडणूक कार्यक्रम जाहीर केल्याच्या दिनांकापासून आदर्श आचारसंहिता अंमलात आलेली आहे. त्यानुसार जालना शहरातील महापालिका निवडणूकीची संपूर्ण प्रक्रिया शांततेत, निर्भय व न्याय वातावरणात पार पाडण्याच्या दृष्टीकोनातून जिल्ह्यातील महापालिका क्षेत्रातील सर्व शासकीय, निमशासकीय कार्यालय, संस्था आणि शासकीय विश्रामगृहांच्या आवारामध्ये कोणत्याही राजकीय पक्षाने, निवडणूक लढविणाऱ्या उमेदवाराने किंवा त्यांच्या प्रतिनिधीने किंवा त्यांच्या हितचिंतकाने सभा घेणे, सदरील आवाराचा वापर राजकीय कामासाठी करणे,रॅली काढणे, निवडणूकी संबंधाने पोस्टर्स, बॅनर्स, पॉम्प्लेट्स, कटआऊट, पेंटींग, होर्डींग्ज इत्यादी लावणे, निवडणूक विषयक घोषवाक्य लिहीणे, किंवा सदरील आवारात निवडणूक विषयक घोषणा देणे किंवा मतदाराला प्रलोभन दाखविणे आणि निवडणूकीच्या कामात बाधा निर्माण होईल अशी कृती करणे इत्यादीबाबी नियंत्रीत करणे आवश्यक आहे. ज्या अर्थी सर्व संबंधीतांना नोटीस देवून त्यांचे म्हणने ऐकून घेणे सद्यस्थितीत शक्य नसल्याने एकतर्फी आदेश काढणे आवश्यक आहे. भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम १६३ अन्वये उक्त ठिकाणी आदर्श आचारसंहिता संपेपर्यंत वरीलप्रमाणे कृती करण्यास निर्बंध घालण्यात आले आहेत, असे आदेश जिल्हादंडाधिकारी आशिमा मित्तल यांनी जारी केले आहेत.

## सार्वजनिक मालमत्ता विद्रुपीकरण प्रतिबंध कायद्यांतर्गत कार्यवाही

**आत्ताच एक्सपप्रेस**

**जालना/ प्रतिनिधी** / भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम १६३ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या शक्तीचा वापर करुन निवडणूकीच्या कालावधीमध्ये जिल्ह्यातील निवडणूक होणाऱ्या महापालिका क्षेत्रातील शासकीय, निमशासकीय, सार्वजनिक मालमत्तेची प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष स्वरुपात विद्रुपता करण्यास निवडणूक प्रक्रीया पूर्ण होईपर्यंत निर्बंध घालण्यात आले आहेत. असे आदेश जिल्हादंडाधिकारी आशिमा मित्तल यांनी जारी केले आहेत.

राज्य निवडणूक आयोगाने महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक - २०२५ साठी निवडणूक कार्यक्रम जाहीर केला आहे. निवडणूक कार्यक्रम जाहीर केल्याच्या दिनांकापासून आदर्श आचारसंहिता अंमलात आलेली आहे. त्यानुसार जालना शहर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक कार्यक्रम घोषित केलेला आहे. काही व्यक्ती, संस्था यांच्याकडून मोठ्या प्रमाणात अनाधिकृत होर्डींग्ज, बॅनर्स, पोस्टर्स व जाहिराती लावून शहरांचे विद्रुपीकरण करण्यात आले आहे. तसेच निवडणूक कालावधीत राजकीय पक्ष अथवा पक्षांशी संबंधीत व्यक्ती, संस्था यांचेकडून होर्डींग्ज, बॅनर्स, पोस्टर्स व जाहिराती लावून सार्वजनिक मालमत्तांचे विद्रुपीकरण करण्याची शक्यता नाकारता येत नाही. राज्य निवडणूक आयोगाने मालमत्ता विद्रुपीत करण्यास प्रतिबंध करण्यासंबंधी दिलेल्या आदेशांचे काटेकोरपणे पालन करण्याबाबत सुचित केल्यानुसार महापालिका क्षेत्रामध्ये निवडणूकीच्या कालावधीमध्ये होर्डींग्ज, बॅनर्स, पोस्टर्स व जाहिराती प्रदर्शीत करताना संबंधित स्थानिक प्राधिकरणाची पूर्व परवानगी घेणे बंधनकारक आहे. तसेच परवानगी कालावधी संपल्यानंतर इमारती, मालमत्ता पुर्ववत करुन घेणे, जाहिराती तात्काळ काढून घेणे आवश्यक आहे. असेही आदेशात नमुद आहे.

## धरणे आंदोलन, मोर्चा, निदर्शने, उपोषण करण्यावर निर्बंध

**आत्ताच एक्सपप्रेस**

**जालना/ प्रतिनिधी** / जालना, दि.२२ (जिमाका) :- राज्य निवडणूक आयोगाने महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक -२०२५ साठी निवडणूकीचा कार्यक्रम जाहीर केला आहे. निवडणूक कार्यक्रम जाहीर केल्याच्या दिनांकापासून आदर्श आचारसंहिता अंमलात आलेली आहे. जालना शहर महानगरपालिका क्षेत्रामध्ये सर्व शासकीय, निमशासकीय कार्यालये/संस्था, शासकीय विश्रामगृह, सार्वजनिक ठिकाणे, रस्त्याच्या ठिकाणी धरणे आंदोलन, मोर्चा, निदर्शने, उपोषण करण्यावर निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत निर्बंध घालण्यात आले आहेत. असे आदेश जिल्हादंडाधिकारी आशिमा मित्तल यांनी जारी केले आहेत.

# नगरपालिका निवडणुकीत 'वंचित'चा डंका; जालन्यात कार्यकर्त्यांकडून फटाक्यांची आतषबाजी आणि जल्लोष

### राज्यभरात १०४ नगरसेवक आणि ५ नगराध्यक्ष निवडून आल्याने मराठवाडा विभागीय कार्यालयासमोर मोठा आनंदोत्सव

**आत्ताच एक्सपप्रेस**

**जालना/ प्रतिनिधी** / महाराष्ट्र राज्य नगरपालिका आणि नगरपरिषद निवडणुकीत वंचित बहुजन आघाडीने (तइ-) अनपेक्षित आणि घवघवीत यश संपादन केले आहे. या यशाच्या पार्श्वभूमीवर, काल २१ डिसेंबर (रविवार) रोजी रात्री जालन्यातील मराठवाडा विभागीय जनसंपर्क कार्यालयासमोर वंचित बहुजन आघाडीच्या वतीने प्रचंड जल्लोष करण्यात आला.



**घवघवीत यशाचा जल्लोष:** रविवारी रात्री निकालाचे चित्र स्पष्ट झाल्यानंतर राज्यभरात वंचित बहुजन आघाडीचे १०४ नगरसेवक आणि ५ नगराध्यक्ष निवडून आल्याची माहिती मिळाली. या विजयामुळे कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. जालन्यातील पक्ष कार्यालयासमोर कार्यकर्त्यांनी फटाक्यांची मोठी आतषबाजी केली आणि 'जय भीम', 'वंचित बहुजन आघाडीचा विजय असो' अशा घोषणांनी परिसर दणाणून सोडला. यावेळी कार्यकर्त्यांनी एकमेकांना पेढे भरवून विजयाचा आनंद साजरा केला.

या आनंदोत्सवात वंचित बहुजन आघाडीचे अनेक वरिष्ठ पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. यामध्ये प्रामुख्याने: दिपक डोके (मराठवाडा उपाध्यक्ष), राजेंद्र खरात (जिल्हा संघटक), रमाताई होर्शिळ (महिला जिल्हाध्यक्षा), विष्णु खरात (जेष्ठ नेते), राज आदमाने, विलास नरवडे (तालुका उपाध्यक्ष), वैभव वानखेडे (तालुका महासचिव), गौतम वाघमारे (तालुका सचिव) तसेच अरविंद होर्शिळ, मिलिंद सरकटे, संजय उघडे, संतोष मगर, अमोल लोखंडे, संकेत दांडगे, संतोष कासार यांच्यासह शेकडो कार्यकर्ते यावेळी उपस्थित होते.

**वंचितचा वाढता प्रभाव:** नगरपालिका निवडणुकीतील या यशामुळे आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत वंचित बहुजन आघाडीची ताकद निर्णायक ठरणार असल्याचे चित्र दिसत आहे. मराठवाड्यासह संपूर्ण महाराष्ट्रात पक्षाने आपली पाळेमुळे घट्ट केल्याचे या निकालावरून स्पष्ट होत असल्याच्या प्रतिक्रिया यावेळी पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केल्या.

# उद्योगांच्या तत्पर वीजसेवेला महावितरणच्या ऑनलाइन 'स्वागत सेल' पोर्टलने नवी ऊर्जा

### - तक्रार निवारणाचा वेगही सुसाट; दर्जेदार सेवेचे दमदार पाऊल
### - २७८ औद्योगिक संघटना थेट संवादासाठी २४७ 'कनेक्टेड'

**आत्ताच एक्सपप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर / प्रतिनिधी** / राज्यातील ४ लाख ४८ हजार उच्चदाब व लघुदाब औद्योगिक वीजग्राहकांना महावितरणकडून जागतिक दर्जाची तत्पर वीजसेवा देण्याची प्रक्रिया ऑनलाइन 'स्वागत सेल' पोर्टलमुळे अतिशय पारदर्शक व वेगवान झाली आहे. उद्योगांना वाढीव वीजभाराच्या मागणीनुसार सुरळीत वीजपुरवठा उपलब्ध होण्यासोबतच विविध प्रश्न व तक्रारी सोडविण्याचा वेगही वाढला आहे. यासह महावितरणसोबतच २४७ थेट संवाद साधण्यासाठी या पोर्टलद्वारे राज्यातील २७८ औद्योगिक संघटना 'कनेक्टेड' झाल्या आहेत.

दरम्यान ऑनलाइन पोर्टलसह औद्योगिक संघटना व वीज ग्राहकांसोबत स्थानिक अधिकाऱ्यांच्या बैठकांसह महावितरणच्या थेट मुख्यालयातून संचालक व कार्यकारी संचालक स्तरावर व्हीडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे स्वतंत्र बैठका घेण्यात येत आहेत. विशेष म्हणजे वीजपुरवठा, नवीन वीजजोडणी, बिलिंग व इतर मुद्द्यांबाबत औद्योगिक संघटना व ग्राहकांनी मांडलेल्या प्रश्नांच्या निराकरणासाठी महावितरणने केलेल्या कार्यवाहीचा अहवाल (-ction Taken Report) माहितीसाठी या पोर्टलवर अपलोड करण्यात येत आहे. आतापर्यंत १२४ कार्यपूर्ती अहवाल अपलोड करण्यात आले आहेत. पोर्टलद्वारे व बैठकांमध्ये प्राप्त झालेल्या विविध २४२ पैकी २१५ तक्रारींचे ताबडतोब निराकरण करण्यात आले तर ऊर्वरित २७ प्रश्न मार्गी लावण्यासाठी नवीन वीजयंत्रणा उभारण्याची कार्यवाही सुरु आहे.

महावितरणकडून औद्योगिक वर्गवारीत लघु व उच्चदाबाच्या दरवर्षी सुमारे २३ हजारांवर नवीन वीजजोडण्या देण्यात येतात. सद्यस्थितीत औद्योगिक ग्राहकांचा एकूण वीजवापरात ४३ टक्के तर महसुलात ४१ टक्के वाटा आहे. राज्यातील औद्योगिक ग्राहकांना थेट संवादासाठी, विविध प्रश्न मांडण्यासाठी तसेच प्रश्नांचे पारदर्शक पद्धतीने व तत्पर निराकरण करण्यासाठी स्वतंत्र पोर्टलची निर्मिती करण्याची सूचना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली. त्यानुसार अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांच्या नेतृत्वात महावितरणने औद्योगिक ग्राहक व संघटनांसाठी ु.ारहरवळीलो.ळप या अधिकृत संकेतस्थळावर स्वतंत्र 'स्वागत सेल' पोर्टल कार्यान्वित केले आहे.

महावितरणच्या 'स्वागत सेल' पोर्टलवर लॉगिनद्वारे लघु व उच्चदाब औद्योगिक ग्राहकांना वीजभार वाढीसह विविध ग्राहकसेवांसाठी मागणी अर्ज तसेच वीजपुरवठा व बिलिंगबाबतच्या तक्रारी करणे सोयीचे झाले आहे. ऑनलाइन अर्ज किंवा तक्रारींबाबत ताबडतोब कार्यवाही करण्यात येत आहे. यासह वीजसेवेसंबंधी सूचना, प्रश्न किंवा विविध मुद्द्यांवर थेट संवाद साधण्यासाठी औद्योगिक संघटनांना स्वतंत्र लॉगिनद्वारे 'स्वागत सेल' पोर्टलवर विशेष स्थान देण्यात आले आहे. राज्यातील २७८ औद्योगिक संघटनांनी लॉगिनद्वारे नोंदणी केली आहे. यात पुणे प्रादेशिक विभागातील ८७, कोकण- ८३, नागपूर- ८० आणि छत्रपती संभाजीनगर प्रादेशिक विभागातील २८ औद्योगिक संघटनांचा समावेश आहे.

राज्यभरातील लघु व उच्चदाब औद्योगिक वीजग्राहकांसह विविध औद्योगिक संघटनांकडून महावितरणच्या ऑनलाइन 'स्वागत सेल' पोर्टलचे स्वागत होत आहे. नियमित संवादासह वीजसेवेचे विविध प्रश्न व मागण्या ताबडतोब मार्गी लागत असल्याने औद्योगिक ग्राहकांच्या वीजसेवेला महावितरणच्या ऑनलाइन पोर्टलमुळे नवी ऊर्जा मिळाली आहे.

# दादरमध्ये शिवोत्सव सोहळ्याचे आयोजन



**आत्ताच एक्सपप्रेस**

**मुंबई / प्रतिनिधी**/ श्री शिवाजी ज्ञानपीठ इंटरनॅशनल आणि मराठी साहित्य व कला सेवा यांच्या संयुक्त विद्यमाने दादर पश्चिम येथील धुरू हॉल मध्ये रविवार दिनांक ४ जानेवारी २०२६ रोजी संध्याकाळी ५ ते ८.३० पर्यंत शिवोत्सव - २०२६ आयोजित करण्यात आला आहे. पुरातत्व व वस्तुसंग्रहालय संचालनालय महाराष्ट्र राज्याचे संचालक डॉ तेजस गर्गे हे जागतिक वारसा स्थळे १२ किल्ले जबाबदारी : सरकारची आणि आपली या विषयावर तर शंभू व्याख्याते अक्षय चंदेल यांचे मला समजलेले छत्रपती संभाजी महाराज या विषयावर व्याख्यान होणार आहे. ज्येष्ठ इतिहास संकलक लेखक दुर्गमहर्षी आप्पा परब यांना जीवन गौरव सन्मान पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. शिवदुर्ग मित्र (लोणावळा),डेला ऍडव्हेंचर (लोणावळा ), यशवंती हायकर्स (खोपोली ), निसर्ग मित्र (पनवेल ), नासिक क्लाइंबर्स अँड रेस्क्यूअर्स असोसिएशन (NCR-) या रेस्क्यू संस्थांचा विशेष सत्कार करण्यात येणार आहे. संस्थेच्या वतीने घेण्यात आलेल्या राज्यस्तरीय मोडी लिपी निबंध स्पर्धा, शिवबावनी कथन स्पर्धा, गडकिल्ले छायाचित्रण स्पर्धा यांचा पारितोषिक वितरण समारंभ सुद्धा यावेळी होणार आहे. हा कार्यक्रम सर्वांसाठी विनामूल्य असून शिवप्रेमी आणि इतिहासाच्या अभ्यासकांनी या कार्यक्रमास अगत्याने उपस्थित राहावे असे आवाहन संस्थेचे प्रमुख डॉ.हेमंतराजे गायकवाड यांनी केले आहे

# वाशिम व मानवत रोड डेपो येथे टॉवर कारचे कमिशनिंग तसेच मानवत रोड डेपो येथे मॉडेल ओएचईची उभारणी

### वाशीम व मानवत रोड डेपो येथे टॉवर कारचे कमिशनिंग





**आत्ताच एक्सपप्रेस**

**नांदेड/ प्रतिनिधी** / नांदेड विभागातील ट्रॅक्शन डिस्ट्रीब्युशन (TRD) विभागाची कार्यक्षमता वाढविण्याच्या दृष्टीने वाशिम डेपो येथे दिनांक १९.११.२०२५ रोजी तसेच मानवत रोड डेपो येथे दिनांक ०३.१२.२०२५ रोजी अशा एकूण २ नवीन टॉवर कारचे कमिशनिंग करण्यात आले आहे.

टॉवर कार ही ढठऊ विभागाची अत्यंत महत्त्वाची यांत्रिक मालमत्ता असून तिचा उपयोग प्रामुख्याने तत्काळ ब्रेकडाऊन अटेंडन्स तसेच ओव्हरहेड इक्विपमेंट (OHE) च्या नियमित देखभाल व दुरुस्ती कामांसाठी केला जातो. नांदेड विभागात एकूण ११ ढठऊ डेपो असून यापूर्वी केवळ ९ टॉवर कार उपलब्ध असल्यामुळे ब्रेकडाऊनच्या वेळी तातडीने काम थोडेशे अवघड होत होते व गाड्यांच्या विलंबाची शक्यता निर्माण होत होती.

नवीन २ टॉवर कारच्या समावेशामुळे आता एकूण ११ टॉवर कार उपलब्ध झाल्या असून, प्रत्येक डेपोसाठी एक टॉवर कार उपलब्ध झाली आहे. यामुळे ब्रेकडाऊनवर जलद गतीने कारवाई करणे शक्य होणार असून, गाड्यांचा विलंब कमी होण्यास तसेच विद्युत ट्रॅक्शन मालमत्तेची विश्वासार्हता व देखभाल कार्यक्षमता वाढण्यास मोठी मदत होणार आहे.

मानवत रोड डेपो येथे मॉडेल ओव्हरहेड इक्विपमेंट (OHE) ची उभारणी

नांदेड विभागात ट्रॅक्शन डिस्ट्रीब्युशन (TRD) विभागाची नुकतीच स्थापना झालेली आहे. विभागातील संपूर्ण रेल्वे वाहतूक विद्युत इंजिनांद्वारे चालवली जात असल्याने, नव्याने भरती झालेल्या कर्मचाऱ्यांना प्रत्यक्ष लाईव्ह ओएचईवर प्रशिक्षण देताना पॉवर ब्लॉक व ट्रॅफिक ब्लॉक यासंबंधी अडचणी येत होत्या.

या समस्येवर उपाय म्हणून मानवत रोड ढठऊ डेपो परिसरात दिनांक २५.११.२०२५ रोजी मॉडेल ओव्हरहेड इक्विपमेंट (OHE) उभारण्यात आले आहे. या मॉडेलमध्ये सर्व मानक ओएचई साहित्य व उपकरणांची उभारणी करण्यात आलेली आहे.

ही सुविधा नव्याने भरती झालेल्या कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्यासाठी वापरण्यात येणार असून, यामुळे कर्मचारी ओएचईचे विविध घटक प्रत्यक्ष पाहू व हाताळू शकतील, तांत्रिक संज्ञांचे ज्ञान मिळवू शकतील तसेच कोणताही पॉवर ब्लॉक किंवा ट्रॅफिक ब्लॉक न घेता सुरक्षित, प्रभावी व सातत्यपूर्ण प्रशिक्षण घेणे शक्य होणार आहे.

या उपक्रमांमुळे नांदेड विभागातील विद्युत ट्रॅक्शन प्रणाली अधिक सक्षम, सुरक्षित व विश्वासार्ह होण्यास निश्चितच मदत होणार आहे.

## नमुना मतपत्रिका छपाईवर निर्बंध

**आत्ताच एक्सपप्रेस**

**जालना/ प्रतिनिधी** / राज्य निवडणूक आयोगाने महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक -२०२५ साठी निवडणूकीचा कार्यक्रम जाहीर केला आहे. निवडणूक कार्यक्रम जाहीर केल्याच्या दिनांकापासून आदर्श आचारसंहिता अंमलात आलेली आहे. जालना शहर महानगरपालिका निवडणूकीची संपूर्ण प्रक्रिया शांततेत, निर्भय व न्याय वातावरणात पार पाडण्याच्या दृष्टीकोनातून राजकीय पक्षांनी, निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांनी किंवा त्यांच्या प्रतिनिधींनी किंवा त्यांच्या कार्यकर्ते व हितचिंतकाने, मुद्रणालयाचे मालकाने व इतर सर्व माध्यमाद्वारे छपाई करणाऱ्या मालकाने तसेच प्रकाशकाने नमुना मतपत्रिका छापताना इतर उमेदवाराचे नाव व त्यांनी नेमून देण्यात आलेले चिन्ह वापरणे. नमुना मतपत्रिकेसाठी मा.निवडणूक आयोगाने निश्चित केल्याप्रमाणे कागद वापरणे. मा.निवडणूक आयोगाने निश्चित केलेल्या कागदाच्या आकारामध्ये नमुना मतपत्रिका छापणे. भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम १६३ अन्वये नमुना मतपत्रिका छपाईवर निर्बंध आदर्श आचारसंहिता संपेपर्यंत घालण्यात आले आहेत, असे आदेश जिल्हादंडाधिकारी आशिमा मित्तल यांनी जारी केले आहेत.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक सुग्रीव सोपानराव मुंढे यांनी निरंकारजी प्रिंट अॅण्ड पब्लिकेशन, पी-३०/०/२,गुलमोहर कॉलनी,एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र), येथे छापून पी-३०/०/२, गुलमोहर कॉलनी, एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
मुख्यकार्यालय-०२४०-२४७४८१३, संपादक-सुग्रीव सोपानराव मुंढे मो.९४२१२८१०७८ , RNI.No.MAH/MAR2011/39247
The Printer, Owner & Publisher **Sugriv Sopanrao Mundhe** Print at Nirankarji Print & Publication, P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003 (M.H.) Published at P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003. (**Editor - Sugriv Sopanrao Mundhe**) Office Ph. : 0240-2474813